# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८८ वा ❑ बुधवार दि.१४ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


**विशेष लेख...**

## रेल्वे स्थानकांवरील ध्वनी प्रदूषण एक गंभीर समस्या

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

रेल्वे स्थानकांवरील ध्वनी प्रदूषण ही एक गंभीर समस्या असून या समस्येवर रेल्वे विभागाला पूर्विचार करण्याची गरज आहे.गाड्यांची हालचाल, घोषणा, प्रत्येक मिनिटाला करण्यात येणारी जाहिरात आणि प्रवाशांचा आवाज यासारख्या अनेक कारणांमुळे निर्माण होणारी एक मोठी समस्या आहे. या प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्यावर आणि आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, ज्यामध्ये श्रवणशक्ती कमी होणे, ताणतणाव आणि झोपेचा त्रास यांचा समावेश आहे.

रेल्वे स्टेशन अनेक कारणांमुळे ध्वनी प्रदूषण होत असते.

गाड्यांचे आवागमन व आवाजहे एक प्रमुख स्रोत आहे, विशेषतः जेव्हा त्या स्टेशनमध्ये प्रवेश करतात आणि बाहेर पडतात, किंवा जेव्हा त्या प्लॅटफॉर्मजवळून जातात तेव्हा मोठ्या प्रमाणावर आवाज होतो.

स्थानकांवरील घोषणा, जसे की ट्रेनच्या आगमन आणि सुटण्याच्या घोषणा, देखील ध्वनी प्रदूषणात योगदान देतात. प्रवाशांच्या संभाषणामुळे, गर्दीमुळे आणि इतर कामांमुळेही ध्वनी प्रदूषण होऊ शकते.

काही स्थानकांवरील हॉर्न, अलार्म आणि इतर आवाजांमुळे देखील ध्वनी प्रदूषण होऊ शकते.

रेल्वे स्थानकावर ध्वनी प्रदूषाला सर्वात मोठे कारण जर कोणते असेल तर जाहिराती. रेल्वे स्टेशनवर मोठ्या प्रमाणात जाहिरात होत आहे.स्टेशनवर मोठ्या आवाजात जाहिराती होत असल्याने ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत आहे.. जाहिरातीच्या चक्कर मध्ये कोणती ट्रेन येत आहे,कोणती जात आहे,याचे भान देखील उद्घोषणा कक्षाला नसते. प्लॅटफॉर्मवर ट्रेनिंग येऊन चुकलेली असते तरीदेखील जाहिरातीच्या चक्कर मध्ये मध्येच अब थोडी देर में ट्रेन आ रही है अशी घोषणा होती. बरेचदा ट्रेन येऊन निघूनही जात असते तरी थोडी देर मे ट्रेन काय फॉर्म नंबर दो से गुजर रही है रेल्वे स्टेशनवर नेहमीच बघायला मिळते एकंदरीत काय तर जाहिरातीच्या चक्कर मध्ये ट्रेन येथे केव्हा आली आणि सुटली याची माहिती प्रवाशांना होत नाही.परिणामतः जाहिरातीच्या चक्कर मध्ये प्रवाशांची ट्रेन बरेचदा निघून जात असते.

ध्वनी प्रदूषणाचे परिणाम:

जास्त काळ आवाजाच्या उच्च पातळीच्या संपर्कात राहिल्याने श्रवणशक्ती कमी होऊ शकते. ध्वनी प्रदूषणामुळे ताण आणि चिंता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे झोपेच्या समस्या आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.शिवाय

उच्च आवाजाच्या पातळीमुळे बोलणे आणि ऐकणे कठीण होऊ शकते, ज्यामुळे संवादात अडचणी येऊ शकतात. आवाजामुळे कार्यक्षमता कमी होऊ शकते, विशेषतः जे लोक स्टेशनजवळ राहतात किंवा काम करतात त्यांना जास्त त्रास होत असतो.ध्वनी प्रदूषणामुळे हृदयविकार आणि उच्च रक्तदाब होण्याची शक्यता वाढते.

रेल्वे स्टेशनवर जाहिरात आणि आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होते, ज्यामुळे आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय करणे आवश्यक आहे.

रेल्वे स्टेशनवर आवाजाची पातळी कमी करण्यासाठी उपाय करणे आवश्यक आहे.

जाहिरातींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

मोठ्या आवाजात जाहिराती न ठेवणे आणि आवाज कमी करणे आवश्यक आहे.

रेल्वे स्टेशनच्या आसपास ध्वनी प्रतिरोधक भिंती उभारणे आवश्यक आहे.

रेल्वे स्टेशनवर पर्यावरणास अनुकूल उपाय करणे आवश्यक आहे.

## ‘कबड्डी’तून खेळाडूंचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ज्योतिर्मय साहित्य

**वर्धा** – ग्रामीण भागातील तरुणाईला कबड्डी या खेळाची विशेष आवड आहे. अतिशय कमी गुंतवणुकीत हा खेळ खेळता येतो. या खेळामध्ये प्रचंड चपळाई, संयम, आक्रमकतेची आवश्यकता असते. या खेळाच्या माध्यमातून खेळाडूंचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज येथे केले.

कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूर व ॲम्युचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ते १२ मे या कालावधीत देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. आज अंतिम सामना व बक्षिस समारंभ रामनगर येथील शहीद भगतसिंग मैदानावर आयोजित करण्यात आला. या स्पर्धेच्या समारोप सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.

आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार समीर कुणावार, आमदार सुमित वानखेडे, आमदार राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार सागर मेघे, सिने अभिनेते सुनील शेट्टी आदी यावेळी उपस्थित होते.

कबड्डी हा खेळ अतिशय प्राचीन आहे. महाभारतामध्ये या खेळाचा उल्लेख सापडतो. संत तुकारामांच्या अभंगात देखील कबड्डीचा उल्लेख आपल्याला आढळतो. देशाचा पारंपारिक खेळ म्हणून कबड्डीकडे पाहण्यात येते. कबड्डी या खेळाला देशी खेळामध्ये अत्यंत महत्त्व असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याचे क्रीडा क्षेत्र वृद्धिंगत व्हावे यासाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने




देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. येत्या काळात जिल्हा तसेच तालुकास्तरावरही अशाच स्पर्धा आयोजन करण्याचा प्रयत्न राहणार आहे. ग्रामीण भागातील क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धा महत्त्वाच्या असतात. या स्पर्धेत देशभरातील एकूण २७ पुरुष संघ आणि २२ महिला संघ सहभागी झाले होते. जम्मू काश्मीर, लडाख या भागातील स्पर्धकही या स्पर्धेत उत्साहाने सहभागी झाले होते. वर्धा जिल्ह्यात फुटबॉलप्रेमींची संख्या व आवड लक्षात घेता जिल्ह्यात फुटबॉलचे ‘एक्सलन्स सेंटर’ सुरू व्हावे, असा मनोदय यावेळी गृहराज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी खासदार तथा विदर्भ कबड्डी असोसिएशन संघाचे अध्यक्ष रामदास तडस यांनी केले. प्रास्ताविकात श्री. तडस यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका व उद्देश याविषयीची माहिती दिली. खासदार प्रफुल्ल पटेल यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त करीत या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेची अंतिम लढत पुरुष गटात दिल्ली विरुद्ध मध्य प्रदेश तर महिला गटात हरियाणा विरुद्ध पश्चिम बंगाल अशी पहायला मिळाली.

## गोमाता संवर्धनाशिवाय नैसर्गिक शेतीला गती नाही–मुख्यमंत्री

ज्योतिर्मय साहित्य

**सिंधुदुर्गनगरी** – शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी देशी गायींचे संवर्धन महत्त्वाचे असून, गोमातेचे संवर्धन केल्याशिवाय नैसर्गिक शेतीला गती मिळणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील करंजेसाटमवाडी (ता. कणकवली) येथे ७० एकर जागेत उभारण्यात आलेल्या गोवर्धन गोशाळा कोकण प्रकल्पाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार नारायण राणे, मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा पालकमंत्री नितेश राणे, माजी मंत्री तथा आमदार दीपक केसरकर, माजी मंत्री तथा आमदार रवींद्र चव्हाण, आमदार निलेश राणे, जिल्हाधिकारी अनिल पाटील, सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा नीलम राणे, रवींद्र पाठक, प्रमोद जठार आदी मान्यवर उपस्थित होते.

गोवर्धन गोशाळा कोकण हा प्रकल्प कै. तातू सीताराम राणे ट्रस्टच्या माध्यमातून राबविण्यात आला असून, गावाच्या विकासासाठी गोमातेचे गोमातेचे महत्त्व फार मोठे आहे. गावाच्या विकासासाठी गोमातेचे योगदान केंद्रस्थानी ठेवण्याचा संकल्प या प्रकल्पामागे आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशातील एकूण गोशाळांपैकी उत्तम गोशाळा कोकणात तयार झाली आहे. या माध्यमातून एक अर्थव्यवस्था तयार होऊ शकते. शेतकऱ्यांना या गोशाळेच्या माध्यमातून व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देता येईल, अशी व्यवस्था येथे आहे. विविध प्रकारची उत्पादन केंद्रे आणि कृषी व पशुसंवर्धनाचे पर्यटन केंद्र म्हणून देखील येथे व्यवस्था करण्यात आली आहे. गोमातेचे महत्त्व आपल्या संस्कृतीत फार मोठे आहे. गोशाळा म्हणजे केवळ गायींचे संरक्षण नव्हे, तर ती एक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणपूरक क्रांती आहे. गावाच्या विकासासाठी अशा प्रकल्पांची गरज आहे. सिंधुदुर्ग जिल्हा निसर्गसंपन्न असून, अशा प्रकल्पांमुळे स्थानिकांना रोजगार, शाश्वत शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीची दिशा मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी हा उपक्रम गोमाता संवर्धनासाठीचा मॉडेल प्रकल्प असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांसाठी हा प्रकल्प दिशादर्शक तसेच मार्गदर्शक ठरेल. निसर्गाची मुक्त उधळण आणि संस्कृतीचा मुक्त ठेवा असलेल्या कोकणात गोमाता संवर्धनासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल. शेतकऱ्यांची समृद्धी साधणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. कोकणात धवल क्रांतीचा पाया घातला जात असून, परिसरातील दूधही येथे संकलित केले जाणार आहे. त्यामुळे दूध व्यवसायालाही चालना मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविकामध्ये खासदार नारायण राणे यांनी गायींचे विविध प्रकार, त्यांच्या वैशिष्ट्यांची माहिती, तसेच दूध, शेण, मूत्र या नैसर्गिक घटकांपासून मिळणाऱ्या उपयुक्त उत्पादनांबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, येथील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, मुलांना चांगले शिक्षण मिळावे, जिल्ह्यातून चांगले अधिकारी घडावेत व समृद्धी निर्माण व्हावी, हा या प्रकल्पामागील हेतू आहे. गोमाता संवर्धन करून जिल्ह्यातील तरुणांनी शेतीपूरक उद्योगात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.


## यादव नव्हारे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करावे

ज्योतिर्मय साहित्य

**माधव बैलकवाड नायगाव** – एखादा पुरस्कार मिळावा यासाठी शिक्षकांची कार्यप्रणाली नसून नोकरी क्षेत्रात मानाचे स्थान असलेलं पद म्हणजे शिक्षक आपण जिथे आहोत तिथे प्रमाणिकपणे काम केले की त्याची दखल घेऊन आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांच्या कार्यांना चालना देणे हे शासनाचे काम आहे पण अलीकडे खरे व निष्ठावंत शिक्षकच सदर पुरस्कारापासून वंचित दिसत आहेत नायगाव तालुक्यातील मांजरम येथील रहिवासी असलेले यादव नागोराव नवारे या शिक्षकांचा कार्यकाळ पंचवीस वर्षाचा असून या कार्यकाळात शैक्षणिक क्षेत्रासह सामाजिक गुण आणि निर्व्यशणीपणा व नम्रता अंगी असलेली दिसून येते त्यांच्या सर्व गुण संपन्न कार्याला आदर्श शिक्षक हा पुरस्कार तंतोतंत जुळतो म्हणून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळावा असे कित्येकांना वाटते.



माधवराव वट्टेमोड विद्यालय जुना कौठा नांदेड येथे गेल्या २५ वर्षापासून शिक्षक पदावर कार्यरत असलेले यादव नवारे यांच्या शाळेतील पंधरा, विस शिक्षकांचा स्टाफ असून या सर्वांकडूनच गेल्या दहा-बारा वर्षांपूर्वी यादव नवारे यांना आदर्श शिक्षक म्हणून संबोधले गेले. एखादा गोड गळ्याचा व्यक्तींना शाहीर म्हणून ओळखले जाते तर वेगवेगळे आवाज काढून मिमिक्री करणाऱ्यांना कलाकार म्हणून ओळखले जाते तसे शिक्षकांचे सुप्त गुण अंगी असणाऱ्या शिक्षकास देखील आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जाते याबाबत यादव नवारे यांचे नाव अग्रक्रमाने पुढे येते पण शासनाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन अधिकृत पुरस्कार जाहीर करणे हे यादव नवारे या शिक्षकांसाठी योग्य ठरेल. शिक्षकवृंद यांची स्वाभिमानाने कशी मान उंचावेल यापैकी नव्हारे आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही, कारण मी एक समाजाचा आरसा आहे ही जाणीव मनाशी ठेवून आपल्या जीवनात कटिबद्ध ते आहेत आजवर कुठलेही व्यसन त्यांच्या अंगी नाही एवढेच नाही तर त्यांनी आपल्या गावी वेसनमुक्ती आंदोलन देखील राबविले गावात शासनमान्य असलेले दारूचे दुकान देखील महिलांच्या पुढाकाराने बंद करण्यात आले कारण दारूमुळे असंख्यजनाचे संसार देशोधडीला लागले हे मार्गदर्शन त्यांचे अनेकांना योग्य वाटले तर आपल्या गावासह इतर गावातील तरुण मुले निर्वेशनी बनावीत म्हणून व्यशन मुक्ती ग्राम क्रांती महासंघाच्या मांजरम सर्कल प्रमुख पदाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन व्यशनमुक्ती कार्यात देखील ते कार्यरत आहेत. आपल्या शाळेसह तालुका जिल्हा पातळीवर शिक्षक मित्राचा अत्यंत विश्वासू मित्र यादव नव्हारे हे झाले म्हणून शिक्षक परिषदेच्या नांदेड जिल्हा कोषाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. बहुजन लोकात अज्ञान आळस व व्यसनीपणा जास्तीचा दिसून येते ही पूर्वीपासूनच मरगळ समाजात आहे हे झिडकारून नव्या प्रगतीच्या मार्गाने चालण्यासाठी महात्मा बसवेश्वर छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीपिता लहुजी साळवे वंदनीय महात्मा फुले ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राजर्षी शाहू महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराशिवाय पर्याय नाही म्हणून या मानवतावादी विचारांचे ते पुरस्कर्ते झाले .या महामानवाच्या विचाराचे संघटन असलेल्या बामसेफ या संघटनेच्या नांदेड तालुकाध्यक्षपदावरती कार्यरत आहेत. समाजात अनेक व्यक्ती वेगवेगळ्या पद्धतीचे दिसून येतात कोण्या अडल्या नडल्या गरजूंना दहा रुपयेची मदत देण्यासाठी दहा लोक जमा करून दहावीस फोटो काढणारे अनेक जण आपण बघितले परंतु यादव नवारे गुरुजी हे आजवर अनेकांना सढळ हाताने मदत केली पण कधी देखावा केलेला नाही हा त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो, महाराष्ट्रातील अनेक जिल्हे वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात नांदेड हा देखील कवीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो त्या कविवर्य महोदय यांच्या यादीत देखील यादव नवारे यांचे नाव आहे त्यांनी आजवर ४०-५० कविताची रचना केली आहे असे बहुआयामी व्यक्तीमत्त्व असलेले यादव नव्हारे हे एक आगळवेगळे आदर्श व्यक्तिमत्व म्हणून परिचित आहेत. जीवनाच्या प्रवासात अनेक लोक भेटतात काही फायदा घेतात काही आधार देतात फरक फक्त एवढाच आहे की फायदा घेणारे डोक्यात आणि आधार देणारे हृदयात राहतात सर्वांच्या हृदयात राहणारे यादव नव्हारे या शिक्षकास शासनाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करावे, चांगल्या व्यक्तीचा सन्मान समाज करते तर शासनाने ही करावे एवढेच....






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीचे अंतर्बाह्य स्वरूप

**ज्योतिर्मय साहित्य**

व्यक्तित्व म्हणजे वेगळं, निराळं अस्तित्व असलेली व्यक्ती. प्रत्येकास जन्मतः स्वतःचं असं व्यक्तित्व असतंच. या व्यक्तित्वावर सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडल्यावर व्यक्तित्वाचं व्यक्तिमत्वात रुपांतर होत असतं. एखाद्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्ती जशी आहे तशी, म्हणजे व्यक्तीची शारीरिक ठेवण, बुद्धी, चारित्र्य, कर्तृत्व, गुण आदींचा समावेश त्यात होतो. व्यक्तीचा शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो. ह्या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तीचा हा घडलेला पिंड म्हणजे त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं. इंग्रजीत पर्सनेलिटी ही संज्ञा व्यक्तिमत्वास वापरतात. पर्सोना या शब्दापासून पर्सनेलिटी हा शब्द तयार झाला. पर्सोना म्हणजे मुखवटा; रोमन काळात नट तोंडावर मुखवटा घालून बोलत असत; अर्थातच जसं पात्र तसा मुखवटा. जसा मुखवटा तसा आवाज आणि भाषण. त्यामुळेच व्यक्तिमत्व म्हणजे बाह्य दर्शन असा अर्थ घेतला जात असतो. व्यक्तिमत्वाचा हा अर्थ एकांगी असल्याचं म्हटलं तर निश्चितच वावगं ठरणार नाही. ह्यामध्ये व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा, बुद्धीचा, भावनांचा, गुणांचा आणि वृत्तीचा अंतर्भाव होत नसल्याचं स्पष्ट होतं. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते.

त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण होऊ शकत नाही. व्यक्तिमत्वात व्यक्तीची शरीरयष्टी, चेहरेपट्टी, ठेवण, बांधा, त्याची बुध्दिकौशाल्ये, क्षमता, अभिरुची, आवडनिवड, संपादित गुण इत्यादी बाबींचा प्राधान्यक्रमानुसार साकल्यानं विचार केला पाहिजे. ह्या सर्वांची व्यक्तीच्या जैविक देणगीपासून व्यक्तिजीवन जगण्यापर्यन्त झालेली वाटचाल म्हणजे व्यक्तिमत्व, असं म्हणल्यास ते व्यक्तिमत्वाच्या व्याख्येच्या दृष्टीकोनातून योग्य ठरू शकतं.

## मानवी मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम





**ज्योतिर्मय साहित्य**

राम आणि कृष्ण दोघेही श्रीविष्णूचेच अवतार. पण त्या दोघांनाही मानवी शरीरात असताना मानवाच्या मर्यादांचे पालन करावे लागले. त्याचमुळे चमत्कारांना त्यांच्या चरित्रात स्थान नाही. पण मानवी मर्यादेत राहून पुरुषोत्तम होता येते, आपला प्रवास मानवाकडून देवत्वाकडे होऊ शकतो हेच त्यांनी आपल्या वागणुकीतून सिद्ध केले. हाच त्यांचा सर्वात मोठा चमत्कार आहे ! त्यांच्या रूपाने देव झाला माणूस आणि माणूस घडला देवासारखा असेच म्हणावे लागेल. दिव्यत्वाचा प्रकाश त्यांच्या ठायी विद्यमान होता. सामान्य माणसांपेक्षा वेगळ्या अशा क्षमता त्यांच्या ठायी होत्या पण त्यांनी त्याचे प्रदर्शन केले नाही. आपल्या क्षमतांचा मर्यादित आणि आवश्यक तेवढाच वापर केला हेच त्यांचं मोठेपण ! त्यांनी जो मर्यादांचा आदर्श घालून दिला तो कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी. श्रीरामांच्या हातात धनुष्यबाण आणि श्रीकृष्णांच्या हातात सुदर्शन प्रसंगानुरूप दिसले असले तरी या दोघांच्याही हृदयात आपल्या कुटुंबाबद्दल, समाजाबद्दल, देशाबद्दल अपरंपार प्रेम होते. सर्वांचे कल्याण व्हावे हा त्यांचा उदात्त हेतू होता. लंका सोन्याची असली तरी मला नको. जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी असे म्हणणारे श्रीराम म्हणूनच आपला आदर्श आहेत. अनेक राज्यांचा स्वामी होण्याची सहज क्षमता बाळगून असलेला श्रीकृष्ण कोणतेही राज्य स्वतःकडे ठेवून घेत नाही. रामप्रमाणेच योग्य त्या व्यक्तींना गादीवर बसवतो. म्हणून तोही आपला आदर्श आहे.



आपण देवांची पूजा करतो. पण राम आणि कृष्ण हे फक्त देव नाहीत, ते मार्ग आहेत. त्यांनी दाखवलेला जीवनमार्ग हा नुसता आदर्शांचा संग्रह नाही, तर संघर्षात, द्वंद्वात, वेदनेत घडलेलं एक मानवी साधनेचं उदाहरण आहे. म्हणूनच ते केवळ पूजेचा विषय नसून अनुकरणाचे आदर्श आहेत. आजच्या भाषेत सांगायचे तर आपले रोल मॉडेल आहेत. पण आपण त्यादृष्टीने त्यांच्याकडे बघतो का हा खरा प्रश्न आहे.

श्रीरामांकडे आपण जेव्हा मनुष्य म्हणून पाहतो तेव्हा त्यांचं जीवन पाहताना असं वाटतं हाही आपल्यासारखा माणूसच आहे, पण थोडा अधिक सहनशील, थोडा अधिक संयमी, थोडा अधिक सात्त्विक. त्यांनाही राग येतो, दुःख जाणवतं, अपमान बोचतो, प्रेमामधला विरह त्यांना सैरभैर करतो पण तरीही ते मोडत नाहीत. ते भांबावत नाहीत. त्या परिस्थितीला धैर्याने आणि संयमाने तोंड देतात. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मृत्यूनिरूपण


**ज्योतिर्मय साहित्य**

५९ ओव्या मध्ये समर्थानी, या निरूपणाची ओळख करून दिली आहे. जसे ज्याचे कर्म असेल तशाच स्वरूपात त्याला अक्षरशः क्षणोक्षणी सामोरं जावं लागेल. मरण आजची घटना ऊद्या वर ढकलू असं होऊ शकत नाही.

१. मरण हे कुणालाही चुकलं नाही. फक्त ते मागेपुढे येते. अंतकाळी कोणी मोठा आहे शुर आहे लढ्वया आहे, बलाढ्य आहे धनाढ्य आहे, प्रतापी आहे, भूपती आहे, चक्रपती आहे, झुंजार आहे. रागीट आहे, विख्यात विद्वान आहे, सर्वगुण संपन्न आहे. त्याला मी कसा नेऊ. असा विचार यमराज कधीच करत बसत नाही। अंतकाळ ही जबरदस्त वाईट वेळ आहे. जो जीव जन्माला आला तो एक दिवस मरणारचं आणि हे अंतिम सत्य आहे त्यासाठी निरोगी जाणीव ठेऊन आपले जीवन सार्थकी करून घ्यावे. वैभवसंपन्न माणूस, अगाध बुध्दीची प्रतिभा असलेला, प्रचंड पुरूषार्थ गाजवलेला, सगळे मरण पावलेले आहेत. मरणाने देह जरी नेला तरीही आपल्या कर्माने सदाचाराने वागून किर्ती रूपाने ऊरावे. ४५ ओव्याच्या पुढे तर समर्थ म्हणतात की जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रचंड नाव कमावलेले गेले. ज्यांनी जगामध्ये ऊलथापालथ केली ते देखील मरणाला शरणं गेले. बळाचा वापर करणारे,भरपूर आयुष्य जगलेला, सगळ्यांना पोसणारे, धर्मरक्षण करणारे, हे आणि असे अनेक लोक गेले. प्रचंड बुद्धीवान गेले, अचाट वादविवाद करणारे, तापसी लोकांचे समुह गेले. विद्वान ब्राम्हणांचे समूह गेले. अनेक अनेक पिढ्या नाहीशा झाल्या पण संत महात्मेचे २. विचार मात्र अमर राहिले.

३. मित्रांनो या निरूपणाचा विचार केला तर एक लक्षात येते जीव जन्माला आला तो जगला ४. माझे माझे करून मरण्यापेक्षा सत्कर्म करत जगावे व सत्कर्म करूनच मरावे.५. श्री राम जय राम जय जय राम ६. जय जय रघूवीर सयर्थ।।

## नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

नामात प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते अन्न गोड लागत नाही अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का याचे उत्तर आपल्याला स्वत:कडूनच मिळण्यासारखे आहे. नाम घेणे हा माझा धर्म आहे ते माझे आद्य कर्तव्य आहे त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की आम्ही नाम खर्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे घेण्याच्या निश्चयाने ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही. नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते.

नामात राहावे म्हणजे अंत:करणाची शुध्दता होईल आणि अंत:करण शुध्द झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामांतच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तिवर परिणाम होऊन तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता बसता चालता बोलता आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोडया श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे.


नामाचे प्रेम यायला एक गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे किंवा दुसरे नामातच माझे कल्याण आहे या भावनेने घ्यावे.

## ।। संत - महात्म्य ।।

संकलन : मधुकर बोरीकर
9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)

### संत जनाबाई

**ज्योतिर्मय साहित्य**



हा संभ्रम दूर करण्यासाठी प्रथम आपण काही शब्दांची उकल करून पाहू.

१) योगी २) अभावयोगी व ३) अयोगी

योगी : ज्यावेळेस पूर्व जन्माचे सुकृत फळाला येते व या जन्मात प्राण,मन,बुद्धी व रक्त यातील रजोगुण व तमोगुण कमी करण्याचे प्रयत्न व्यक्ती करतो व त्यास त्याच्या सुदैवाने सद्गुरूंची प्राप्ती होते, त्यावेळेस प्रत्येकाच्याच जवळ असणारी, सुप्त रूपात वावरणारी, माता भगवती जगदंबा, हिलाच, तिच्या गोल म्हणजे, कुंडलाकार आकारावरून कुंडलिनी माता असे संबोधल्या जाते ,ती सद्गुरूंच्या चैतन्य मय शक्तीपाताने हलकीशी जागी होते. यानंतर शिष्याचा अध्यात्मिक प्रवास सुरू होतो. त्याचे पराकोटीचे प्रयत्न व सद्गुरु चा कृपा आशीर्वाद यातून शिष्य पूर्णत्वास पावतो व अंतिमतः तो हरी रूप होऊन जातो. तो नराचा नारायण होतो.

अभावयोगी : हे विज्ञाननिष्ठ योगसामर्थ मिळण्यासाठी प्रयत्नशील असणारे साधक असतात. पतंजली मुनिनी सांगितलेली अष्टांग साधने, म्हणजेच यम नियम ,आसन ,प्राणायाम,प्रत्याहार, ध्यान ,धारणा आणि समाधी या आठही पायऱ्या हळूहळू नेटाने चढायचा प्रयत्न करतात . हा आठ अंगांनी करावयाचा प्रयत्न ते स्वतःच्या मतीने म्हणजे बुद्धीने प्रयत्नपूर्वक करीत असतात. यात वैज्ञानिक कृती वापरून हा चढ काही स्थानापर्यंत चढता येतो.

आपल्या सर्वांच्या भावना मस्तकात म्हणजेच उपादेय हृदयात ब्रह्मरंध्राचे संनिध अति सूक्ष तंतूत किंवा ग्रंथीत निरंतर स्पंदन स्फुरण कंपने चालू असतात. येथे इच्छा आकांक्षा जन्म घेतात. ज्या आपणास दुःख, कर्मबंधनास प्रवृत्त करतात. या मस्तका तील स्थानापासून ऐच्छिक अनैछीक हालचालींना निराळ्या शक्तींच्या द्वारे प्रेरणा मिळतात. संकल्पाचे स्थानातील पूर्ण स्पंदन ध्यान योगाच्या साधनांनी प्रतिप्रसव पद्धतीने बंद होऊन सहज समाधीचा अनुभव येतो. हा योगरूप पर्वताचा माथा आहे. यालाच ज्ञानेश्वर माऊलींनी निमथा म्हटलेले आहे. अर्जुनाला उपदेश करताना भगवान म्हणतात तुला जर हा योग स्थिरतेच्या पर्वत माथ्यावर जाऊन अखंड विसावा घ्यायचा असेल म्हणजे ती स्थिती ढळू द्यायची नसेल तर कर्ममार्गी प्रवृत्तीतून निवृत्त झाले पाहिजे. प्रवृत्तीतून निवृत्त करणारा अभ्यासात चढ आहे. चढण चढायला अंगात शारीरिक बळ व दैवी बळ वाढवावे लागते. ते यम नियम आसन प्राणायाम प्रत्याहार यांच्या प्रयोगांनी वाढते.( *प्रत्याहार म्हणजे प्राण संगतीने अंतर्मुख झालेल्या चित्तास आत्म रूपात गुंतवून ठेवण्याचा दांडग्या प्रयत्न* )

**(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु**
**लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।**
**अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा**
**न्याय्यात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ।।**

अर्थ – नीतीचे जाणकार लोक निंदा करोत अथवा स्तुती करोत, लक्ष्मी तिच्या इच्छेनुसार येवो अथवा जावो, मृत्यु आज होवो अथवा युगांतरी होवो, धीरोदात्त लोक आपल्या न्याय्यमार्गापासून एक पाऊल देखील विचलित होत नहीत.

न्याय्यमार्गावर अढळ राहण्याविषयी येथे सांगण्यात आले आहे. जर आपला मार्ग न्याय्य असेल, तर लोकापवाद इ. भय किंवा आर्थिक द्वंद्व अशा कोणत्याही कारणाने आपण तो मार्ग नीतिज्ञ लोक सोडत नाहीत, असे प्रतिपादन भर्तृहरींनी केले आहे.



## आरोग्य संजीवनी

### स्वस्त पण बहुगुणी तुरटी

**ज्योतिर्मय साहित्य**

पांढरे केस काळे आणि मजबूत करण्याचे ७ नैसर्गिक उपाय–

दाट, मुलायम केस असावेत, असे प्रत्येकाला वाटते. मात्र वेळेपूर्वी केस पांढरे झाले तर चिंता वाढते. आजकाल कमी वयातच केस पांढरे होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यावर आपण निरनिराळे उपाय करु लागतो. खरंतर मेलेनिन पिग्मेंटेशनच्या कमतरतेमुळे केसांचा रंग पांढरा होऊ लागतो. त्याचबरोबर धूळ, प्रदुषण इत्यादी कारणांमुळे केसांचे पोषकतत्त्व कमी होऊ लागते. याव्यतिरिक्तही तणाव किंवा अनुवंशिक आजारांमुळे केस पांढरे होऊ लागतात. यावर काही नैसर्गिक उपायही आहेत. त्यामुळे केस पुन्हा काळे होण्यास मदत होईल.

पेरुची पाने

पेरुची पाने वाटून त्याची पेस्ट करा. ही पेस्ट केसांना लावल्याने केस काळे होण्यास मदत होते. पेरुच्या पानात व्हिटॅमिन बी, सी असते. त्यामुळे केसगळती रोखण्यास आणि केस पुन्हा उगवण्यास मदत होते.

कडीपत्ता

कडीपत्ता फक्त पदार्थाचा स्वाद वाढवत नाही तर त्यात अनेक आरोग्यदायी गुणधर्म ही आहेत. कडीपत्ता खोबरेल तेलात घालून रोज त्या तेलाने केसांना मसाज करा. रात्रभर ठेवा आणि दुसऱ्या दिवशी शॅम्पूने केस धुवा. असे नियमित केल्यास लवकरच परिणाम दिसू लागेल.

खोबरेल तेल

खोबरेल तेलात लिंबाचा रस घाला. त्याने डोक्याला हलक्या हाताने मालिश करा. त्यामुळे केस काळे आणि चमकदार होतील.

कांद्याचा रस

कांद्यात सल्फर असते ज्यामुळे केस काळे होण्यास मदत होते. यामुळे २,३ कांदे कापून त्याचा रस काढा आणि केसांना लावा. यामुळे केस काळे होतील आणि केसगळती थांबेल. मात्र हा उपाय नियमित करणे आवश्यक आहे.

चहापावडर

पांढरे केस काळे करण्यासाठी चहाची पावडर फायदेशीर ठरते. चहा पावडर चांगल्या प्रकारे उकळवून घ्या आणि या पाण्याने केस धुवा. याचा परिणाम तुम्हाला हळूहळू दिसू लागेल.

आवळा

आवळ्याचे छोटे छोटे तुकडे करुन तेलात उकळवा. आवळ्याचा रंग काळा झाल्यानंतर या तेलाने केसांना मालिश करा. याशिवाय आवळ्याच्या पेस्टमध्ये लिंबाचे काही थेंब घाला.

कोरफड

कोरफड बहुगुणी असल्याचे आपण जाणतोच. त्वचेसोबतच केसांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी कोरफड फायदेशीर ठरते. केस धुण्यापूर्वी कोरफड जेल लावा आणि मसाज करा. त्यानंतर केस धुवा. केस काळे आणि दाट होतील.

उडीद खाण्याचे आयुर्वेदिक फायदे

पचन सुधारतेउडीद डाळ खाण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते तमच पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. यामध्ये आहारातील फायबरचे प्रमाण जास्त असते. हे पचनसंस्थेचे चांगले कार्य करण्यास मदत करते आणि मल नियमित करते तसेच विषारी द्रव्ये बाहेर काढण्यासाठी पेरिस्टॅलिसिस (आकुंचन आणि ओटीपोटाचे स्नायू सोडणे) उत्तेजित करते.

शरीरातील ऊर्जा वाढते

काळ्या उडीद डाळीमध्ये भरपूर लोह असते. त्यामुळे तुमच्या शरीरातील ऊर्जा पातळी वाढण्यास मदत होते. लोह हे तुमच्या शरीरासाठी अत्यंत महत्वाचे पोषक तत्व आहे कारण ते लाल रक्तपेशींच्या निर्मितीस मदत करते. या पेशी तुमच्या सर्व अवयवांना ऑक्सिजन वाहून नेण्यासाठी जबाबदार असतात. जेव्हा तुमच्या शरीरातील सर्व अवयवांना पुरेसा ऑक्सिजन मिळतो तेव्हा शरीरातील उर्जेची पातळी सुधारते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९






**ज्योतिर्मय साहित्य**

ते कोणतेही पदार्थ माणसाच्या जीवनात समाधान निर्मितीचे कारण ठरत नाहीत. मग त्या पदार्थांबद्दल आमच्या अंतर्गत त्यागाची भावना का नाही निर्माण होत? मला माहिती आहे की, या इथे राहून माझ्या जीवनाची धन्यता होणार नाही .खाऊन शरीर पुष्ट होईल. पण मला आत्मज्ञान होणार नाही. तरीसुद्धा मला या पदार्थांविषयी, या संसाराविषयी, या जन्म मरणाविषयी ,माझ्या अंतःकरणांमध्ये कुठल्याच वैराग्याचा भाव का निर्माण होत नाही. फक्त जन्माला येणं मरण आणि तेही परतंत्रतेमध्ये एवढेच माणसाच्या हातात आहे का? आत्मकल्याणाची स्वतंत्रता माणसाला दिलेलीच नाही का? सगळं कर्मानेच होणार असेल तर ,आम्ही काय करावे? जन्माला यायचं तेही कर्माने ,मरायचं तेही कर्माने ?.नाही. या जगात भोग घ्यायचे तेही कर्माने मग आम्ही करायचं काय? ज्ञानाचा विचार येतो दुःख निवृत्ती कशाने होईल? मी बाल्यावस्थेमध्ये दुःख तारुण्यामध्ये दुःख, प्रौढावस्थेमध्ये दुःख वृद्धापकाळ मध्ये दुःख आहे.बाल्यावस्थेमध्ये अज्ञानाचे दुःख असतं बालपण गेले नेणता. तरुणपणी प्रवर्तली चिंता लहान मुलाला अज्ञान काही त्याला समजत नसतं कोण आहे ?काय खाऊ घातलं जातंय ?आपल्याला याची चव काय आहे ?याच्यामध्ये काय काय असेल? हे कसं बनवलं? पाणी प्यायला दिलं की प्यायचं. भूक लागली की रडायचं .तहान लागली की रडायचं. झोप आली की झोपायचं. सगळ्यांना आवडतं हेच, पण बाल्यावस्थेमध्ये हे अज्ञानाने होतं.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

**(क्रमशः)**

## रवींद्रनाथ टागोर

विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

या नाटकात रवींद्रनाथांनी शिकारी जंगलातील प्राण्यांची शिकार करताना दाखवले आहेत. जंगलातील वृक्ष, प्राणी, पक्षी आदींचा ते विनाश करतात. पूर्वीच्या काळी राजे लोक आपल्या इच्छेसाठी जंगली प्राण्यांची शिकार करीत किंवा मृगयेसाठी बाहेर पडत असत. आज मानव आपल्या आवडीखातर आणि उपभोगासाठी जंगलांचा नाश करतो आहे हे या नाटकात त्यांनी दाखवले आहे. आज जंगलतोडीमुळे ग्लोबल वॉर्मिंगसारखी परिस्थिती उद्भवली आहे. पर्यावरण उध्वस्त होत आहे आणि याचे भयंकर परिणाम मानवाला भोगावे लागत आहेत. यातूनही जर मानव सावध झाला नाही तर भविष्यकाळामध्ये आणखीही भयानक अनर्थ ओढवू शकतो. हे या नाटकातून रवींद्रनाथांनी सूचित केले आहे.

या नाटकात वनदेव आणि वनदेवता दाखवले आहेत. त्यांची गाणी म्हणजे उत्तम अशा प्रकारचे पद्य आहे. त्यातून पर्यावरणाचा संदेश दिला आहे. दशरथ राजाच्या शिकारीचे दृश्य आजूबाजूच्या वातावरणाचा आणि आवाजांचा उत्तम वापर करून परिणामकारकपणे साधले आहे. जंगलात शिकार करण्यासाठी येणाऱ्या शिकाऱ्यांचा समूह हा विनाशाचे प्रतीक आहे तर वनदेवी आणि वनदेवता निसर्गाचे मूर्त स्वरूप आहेत. या नाटकात निसर्गाची अभिजातता भारतीय शैलित टिपली आहे तर विनाशाचे प्रतीक असलेले शिकारी आणि त्यांचे नृत्य पाश्चात्यशैलीत चित्रीत केले आहे. यातूनच पाश्चात्य संस्कृतीचा भारतीय संस्कृतीवर कसा प्रभाव पडतो हे रवींद्रनाथांनी सुचित केले आहे आंधळेपणाने पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यापेक्षा आपण आपली संस्कृती जपली पाहिजे आणि पाश्चात्य संस्कृतीतील जे जे चांगले आहे ते घेऊन पौर्वात्य आणि पाश्चिमात्य शैलींचा संगम साधायला हवा म्हणजे आपण एक सुंदर अशा नवीन जगाची निर्मिती करू शकू असेच जणू रवींद्रनाथ सुचित करतात.

१८८४ मध्ये त्यांनी प्रकृतीर प्रतिशोध हे नाटक लिहिले. त्यानंतर मायार खेला हे त्यांचे १८८८ मध्ये आलेले चौथे नाटक. हे नाटक इतर नाटकांपेक्षा थोडे वेगळे आहे. या नाटकात प्रेमाचा त्रिकोण दाखवला आहे. हेही संगीत नाटकच आहे या नाटकात स्वतः रवींद्रनाथ आणि त्यांची पुतणी अभिज्ञादेवी यांनी प्रमुख पात्रांची भूमिका केली आहे. रवींद्रनाथांच्या अभिजात अशा गानलकेरींना जेव्हा अभिज्ञादेवींच्या सुरांची साथ लाभत असे तेव्हा सारे नाट्यगृह सुरांच्या वर्षावात न्हाऊन निघे आणि रसिक या काव्यसंगीताच्या आनंदात चिंब भिजत असत.

# प्रेमाचं अबोल रूप...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

''माय'' एक शब्द, पण त्यामागे असतो एक अखंड प्रेमाचा झरा, एक मूक झुलता आभाळ, आणि एक अखंड ऊर्जेचा स्रोत. माय म्हणजे केवळ आपली जन्मदात्रीच नाही, तर ती एक विश्व असते. प्रेमाचं, त्यागाचं, सहनशीलतेचं, आणि अनामिक पण खोल अशा नात्याचं.

बालपणीचं प्रत्येक पाऊल मायच्या सावलीतूनच चालायला शिकतं. तीच आपली पहिली गुरू, पहिली देखभाल करणारी, आणि पहिली नजरेतून समजून घेणारी. एखादं मूल रडायला लागलं, की तिच्या मिठीतच ते गहिऱ्या समुद्रासारखं शांत होतं. आईच्या स्पर्शात जणू औषध दडलेलं असतं.ज्यामुळे वेदना कुठेच हरवून जातात.

मुलाच्या जन्मापासूनच तिचं आयुष्य दुसऱ्या कुणासाठी जगायला लागतं. ती आपलं दुःख लपवून जगाला हसतं दाखवत राहते. जेव्हा लहान मूल आजारी पडतं, तेव्हा आई दिवस रात्र झोप न घेता त्याची सेवा करत राहते. तिच्या हातांनी बनवलेला भात, तिच्या हातचं फडफडीत पोळीभाजी, किंवा तिच्या हाताचं उष्ण दूध. हे सर्व केवळ अन्न नसतं, ते असतं तिचं प्रेम आणि आशीर्वाद. ''मुलं कुठे आहेत? अंधार व्हायला लागलाय...'' हा तिचा हाक देणारा आवाज. हा आवाज चिंता, काळजी, प्रेम आणि अनिवार जिव्हाळा यांनी गुंफलेला असतो. तो आवाज मनात घर करून राहतो. कितीही मोठं झालं, जगाच्या पाठीवर कुठेही गेलं, तरी मायचा हाक देणारा आवाज कानात घुमत राहतो.

आई म्हणजे घराचा उंबरठा... जिथे आपण रडत जन्मतो आणि हसत हसत घरातून बाहेर पडतो. ती वाट पाहत असते दरवाज्यात उभी राहून, डोळ्यांत वाट पाहणारे सावलीसारखे क्षण घेऊन. तिचं हसणं मुलाच्या हसण्याशी जोडलेलं असतं. तिचं मन मुलाच्या सुखदुःखाशी बांधलेलं असतं. तिच्या आनंदासाठी मुलाचं हसणं पुरेसं असतं.आईचं प्रेम बोलून व्यक्त होणारं नसतं. ती बोलत नाही ती करत असते. तिला अपेक्षा नाहीत, पण तिचं प्रत्येक देणं अपरिमित असतं. एक आई किती झिजते, ती स्वतःसाठी किती बाजूला राहते, याची कुणी नोंद ठेवत नाही. पण तिचं अस्तित्व आहे म्हणूनच आपण आहोत. कधी तिला शब्द कमी वाटतात. ती गप्प राहते, पण तिचं मौन सगळं सांगून जातं. तिचे डोळे बोलतात, तिचे हात सांगतात, आणि तिची झोप उडालेली रात्रसुद्धा प्रेमाने भरलेली असते. तिच्या नजरेतून काळजी, तिच्या मिठीतून आशीर्वाद आणि तिच्या डोळ्यांतून देव सापडतो.

आई म्हणजे त्यागाची देवता. तिच्या आयुष्यात अनेक स्वप्नं असतात, पण ती आपोआपच बाजूला होतात. ती स्वतःसाठी काही न मागता सर्वकाही मुलांसाठी करत राहते. तिच्या साड्या जुन्या राहतात, पण मुलांचं नवीन कपड्यांमध्ये स्वागत करत राहते. तिचं आरसा पाहणं थांबतं, पण मुलांचं चेहरा उजळवण्यासाठी ती प्रयत्न करत राहते. तिचं हास्य म्हणजे जगातलं सर्वांत सुंदर हास्य. ते हास्य तिच्या जीवनातल्या दुःखावरचं झाकण असतं. कितीही कठीण परिस्थिती असली, तरी ती आपल्यासमोर धीराची मूर्ती बनून उभी राहते. तिचं एक स्मितसुद्धा जीवनाला प्रेरणा देऊन जातं.



बबलू कराळे (स. शिक्षक)
अमरावती
मो. ७२१८०२९८३८

आई ही केवळ व्यक्ती नसते, ती एक प्रेरणा असते. तिचं आयुष्य म्हणजे शिकवण. तिचं बोलणं, तिचं वागणं, तिचं जगणं हे सगळं शिकवणारं असतं. ती सांगते, ''प्रामाणिक रहा, प्रेम करा, आणि हार मानू नका.'' तिच्या हातात कधी पोथी नसते, पण तिचं प्रत्येक वाक्य जीवनाचं श्लोक ठरतं. काळ पुढे जातो. आपण मोठे होतो. आई म्हातारी होते. केस पांढरे होतात, चाल मंदावते. पण तिचं प्रेम कधीही थकत नाही. तिचं आशीर्वादाचं हात सदैव डोक्यावर असतो. आणि तेव्हा जाणवतं... आपलं सर्वकाही जर कोणी अबोलपणे दिलं असेल, तर ती केवळ ''माय''.

आई ही हवा सारखी असते. दिसत नाही, पण जाणवते. तिच्या अनुपस्थितीत तिचं अस्तित्व अधिक तीव्रतेने जाणवतं. तिच्या जाण्याने एक शून्य निर्माण होतं जे काहीही भरून निघत नाही. ती असते, तेव्हा तिचं महत्त्व कधीच पुरतं उमगत नाही. पण एक दिवस, जेव्हा ती नसेल, तेव्हा प्रत्येक क्षणाला ती आठवते तिचं गोड बोलणं, ती केलेली चहा, ती लावलेली उटणं, आणि ती उगाचच केलेली चिडचिड. आई गेल्यानंतर तिचं आठवणींचं घर आपल्या मनात वसतं. तिचं उंबऱ्यापाशी थांबणं, तिचं उशी घेवून झोप असं म्हणणं, किंवा थोडं खा ना म्हणतं आग्रह करणं हे सगळं मनाच्या खोल खोल कप्प्यांमध्ये जपलेलं राहतं. त्या आठवणी कधीही विसरता येत नाहीत. त्या नुसत्या आठवल्याने डोळ्यांत पाणी येतं.

शेवटी काय? देव सगळीकडे असतो असं म्हणतात. पण लहानपणी तो मायच्या रूपातच दिसतो. तिच्या डोळ्यात, तिच्या कुशीत, तिच्या हाताच्या चवीत देवाचं अस्तित्व जाणवतं. आणि म्हणूनच कुणीतरी म्हटलंय ''स्वर्ग हा आईच्या पायांखाली असतो.'' आईसारखी दुसरी व्यक्ती जगात कुठेही नाही. तिचं प्रेम, तिचा त्याग, तिचं सहनशीलपणं हे इतकं मोठं आहे की शब्दही अपुरे पडतात. हा लेख फक्त भावनेचं थोडंसा चित्रण आहे. पण आईच्या विशाल अस्तित्वाचं एक अंशही यामध्ये मावू शकणार नाही. तिचं प्रेम म्हणजे सागर आहे.खोल, शांत, पण अंतहीन. ''माय'' हा शब्द उच्चारतानासुद्धा मन नमतं आणि डोळ्यांतून ओलसर प्रेम वाहू लागतं.

## इंदापूरी निखारे



### नवरा, बायकोचं नातं...



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

संस्कृती, परंपरा आणि भावनांचा धागा...
मुलगी मोठी झाली की...
घरा घरात एक न सांगता येणाऱ्या भावनांचा वावर...
आनंदाने रेशमी धाग्यानी अतूट नाती घट्ट ह्रदयात...
कायमस्वरूपी...
मुलगी म्हणजे परक्याचे धन, लक्ष्मी...
ही परंपरा किती भावुन जाते ना !
आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटतो...
अश्या महान परंपरा मुळे...
लग्न ही एक सामाजिक बांधिलकी म्हणून नाही...
तर तो एक संस्कार... आयुष्यभराच्या सहजीवनाचा सार्वजनिक आणि धार्मिक स्वीकार...
विविध राज्यांमध्ये...
विविध जाती, धर्मांमध्ये...
विवाहाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या परंपरा...
लोककला, लोकसंगीत, लोकनृत्य...
धमालच...
या संस्कृतीचा अतिशय महत्वाचा एक गाभा म्हणजे...
स्त्रीला लक्ष्मी मानणं...
विवाहानंतर जेव्हा एक स्त्री नव्या घरात प्रवेश करते, तेव्हा ती केवळ पत्नी नसते...
या नात्यात सौंदर्य आहे...
कारण ते केवळ शारीरिक जवळीक नाही...
तर भावनिक, सामाजिक आणि...
वगैरे वगैरे वगैरे...
पण हे आता खरं आहे का?
त्या भावना, प्रेम...
किती विचित्र रूपाने समोर येत आहेत...
पती पण परमेश्वर राहिला नाही...
स्त्री पण देवी म्हणून राहणे अशक्य...
स्त्रियाना, मुलीना अजूनही सन्मानाने जगण्यासाठी...
किती संघर्ष करावा लागतो...
उलट स्त्री पुरुष संबंध...
जसे सुशिक्षित झाल्यावर...
फारसा बदल झालेला दिसत नाही...
संस्कृती, परंपरा फक्त इव्हेन्ट रूपात...
कायदे कडक करावे लागत आहेत...
स्वतंत्र स्वातंत्र्य म्हणत...
वेगाने फक्त नर आणि मादी...
या मानसिकतेत जगणं...
कधी कधी वाटते...
तांत्रिक प्रगती मुळे...
भाव भावनांना...
अनेक नात्यांना...
तिलांजली तर देत नाही?
अगदी हसत खेळत...
निर्भय बनून...


# शब्दवेधच्या प्रा.सुरेश पुरी लोकपत्रकारिता पुरस्कारासाठी अमर हबीब यांची निवड

## १८ मे रोजी संभाजीनगर येथे पुरस्कार वितरण


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – शब्दवेध बुक हाऊस प्रकाशन संस्थेच्या वतीने जनसंपर्क तज्ज्ञ प्रा. सुरेश पुरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, 'जनसंपर्कतज्ज्ञ प्रा. सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता' पुरस्काराची नुकतीच घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे पाहिले मानकरी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब, (अंबाजोगाई) यांची निवड करण्यात आली आहे.

शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने या वर्षापासून सदर पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. अकरा हजार रुपये रोख रक्कम, मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता, मौलाना आझाद संशोधन केंद्र, मजनु हिल, संभाजीनगर येथे होणार आहे. चंद्रसेन कवडे कार्यक्रमाचे अध्यक्ष असून डॉ प्रल्हाद लुलेकर व दगडू लोमटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पुरस्काराचे पहिलंच वर्ष असून यापुढेही लोकपत्रकारिता करणार्या पत्रकारांचा सन्मान करून या पुरस्काराचे मूल्य जपण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील, असे शब्दवेधचे वैजनाथ वाघमारे यांनी सांगितले.



## जात्यावरच्या ओव्या......



### नातेसंबंध: पती-पत्नी

*लिंबाच्या लिंबोळ्या*
*लिंबा खाली पसरल्या*
*भावाला झाल्या लेकी*
*बहिणी विसरल्या ||७३||*

*काढून सुकली*
*आंब्या खालची हराळी?*
*लेकीला मुर्हाळी*
*सासू धाडेना बारोळी ||७४||*

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



### शंकासुर (पीकॉक फ्लावर)

*नाजूक तजेलदार पानांचे शंकासूराचे सुरेख दिसते झाड,*
*तप्त उन्हातच होते या झाडावरच्या पानाफुलांची वाढ..*
*लाल, पिवळ्या, केशरी रंगाची शंकासुराची फुले दिसतात सुंदर आणि झुपकेदार,*
*पोपटांना या झाडाच्या शेंगा आवडतात ते खाण्यासाठी झाडावर आल्याने येते आणखीन बहार..*

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

# आणि त्याची मनातली हिरवाई....

अगदी फार पूर्वी नात्यात किंवा गावात फार तर पाच कोसावर मुलीचे सासर गाव असे.. सहज सणावाराला माहेरी जाता येईल असे.. नंतर तिचा स्वतःचा संसार बहरला की सासर हेच तिचं विश्व बने. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत. आता काळ बदलला शिक्षण नोकरी निमित्याने मुले बाहेर पडली अगदी साता समुद्रापारही काही गेली. आणि आमच्या पिढीचे परत एक गाव बदलले. मुलांचे गाव... विभक्त कुटुंब, सुनांना/मुलींना काळाप्रमाणे नोकरी करण्याची गरज आणि मग नातवंडांच्या ओढीने हे गाव सोडून परत या वळणावर आपले मुळं मुले जिथे असतील तिथे रुजवयाचे.. पण इतके सोपे असते का ते ? माझा तर तीन तपाचा काळ माझ्या या मिरज गावात गेला.. त्याने सासरी आल्यावर लगेचच हलकेच आपल्या कुशीत कधी घेतले हे मला समजले पण नव्हते.. पण आता मुलाचे गाव पुणे हे माझे गाव याचा स्वीकार करायला हवा. मिरज अधून मधून भेटणार.. त्याच्या माझ्यातील भेटीचे अंतर वाढत चालले आहे, पण इलाज नाही..

आजही दोन महिन्यांनी आम्हीं गावात परतत होतो... २६ जानेवारी असल्यामुळे सगळीकडे रांगोळ्या, झेंडे, आणि मिरजेची खासियत असलेले जिलबी, खाजा चे स्टॉल सगळीकडे दिसत होते. तो उत्साह अलगद आमच्याही मनात उतरत होता. गाडी जसजशी घराकडे वळत होती तशा वाटेतल्या ओळखीच्या खुणा नव्याने भेटत होत्या..

अजून गाडीतून उतरेपर्यंत आजी बाई अभिनंदन म्हणत शेजारचे दादा, आजी सामोरे आले.. छोटी बच्चे मंडळी मावशी मावशी करत धावत आली. त्यांना मला अनेक गंमती मध्ये सामील करून घ्यायचे होते.



सासरचे गाव ...
मिरज
सौ.माधुरी म.इनामदार

बिल्डिंग मधील मनीषाने दही लावून, दूध तापवून ठेवले होते. किती दिवसांनी मला सगळ्या भेटत होत्या. माझ्यासाठी गच्चीवरील एकत्र जेवण करणे बाकी ठेवले आहे असे प्रज्ञा म्हणाली. स्मिता, काकू, काय करून देऊ ग म्हणत चौकशी करायला आल्या. अशा प्रेमाच्या घेरावात मी सहज विरघळत होते.

तुळस थोडी सुकली आहे, पण अळू आणि ओवा छानच हिरवागार झाला होता. गुलाबी गुलाब बहराच्या वाटेवर आहे. जाताना मी भाज्यांच्या बिया टाकून गेले होते त्यातील काही झाडे लागू झाली आहेत. आणि याचे सगळे श्रेय शेजारच्या काकूंना आहे. त्या न विसरता त्यांना पाणी घालतात म्हणून त्यांचा ताजेपणा टिकून आहे.

घर, मीच आणलेल्या पसाऱ्यांनी आज परत थोडे जास्तच भरले आहे. पण अगदी वस्तू वस्तू मला नव्याने भेटतीय. त्यामुळे तो पसारा मनात डाचत नाहीये. काय काळजी करू नका वहिनी मी उद्या येऊन तुम्हांला समद आवरून देते असा कामवाल्या ताईचा फोन आलाय. हे सगळे सगळे मी तिकडे कुठेतरी मिस करत होते. अजून तरी ते बंद दारांचे पुणे मला अनोळखी वाटते. इथल्या मनातली हिरवाई तिथे कुठे दिसत नाही.

अर्थात तिथे मलाच ती रुजवायला हवी याची जाणीव आहे. पण सध्या मी माझ्या या गावात नातवाचे स्वागत करायला उत्सुक आहे.. त्याची छोटी बाळ पाऊले पहिल्यांदा या घरी येणार याचा आनंद खूप आहे. (सुनेला तर मिरज आवडतेच) पण त्याच्या जीवनाची सुरुवात इथे होणार आहे आणि ती अशा प्रेम सिंचनात आणि कौतुकात होणार याचे समाधान आगळे आहे. त्यामुळे आता पुढचे चार महिने मी आणि तो नक्कीच या आठवणी जपून ठेवू. पुढच्या प्रवासातील शिदोरी म्हणून...

***

## गमतीदार किस्से



प्रत्येक जणांच्या आयुष्यात काही गमतीदार किस्से घडतातच काही आयुष्यभर आठवणीत राहतात. असे काही किस्से आम्ही शेअर करू इच्छितो आमच्या *गमतीदार किस्से* या सदरातून. मग वाट कसली बघता घ्या पेन आणि लिहायला सुरु करा आणि पाठवा मला *7743918559* या व्हाट्सअप नंबरवर. शब्दमर्यादा 150 शब्दापर्यंत.
आम्ही पोहोचवितो ते किस्से लाखों लोकांपर्यंत *ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ* च्या माध्यमातून आणि तुमचा फोटो सोबत पाठवा.
*संजय व्यापारी*
संपादक, ज्योतिर्मय
7743918559

# फोंडा गोवा येथे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

**फोंडा –** सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ.जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष यांच्या निमित्ताने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र, गोवा, उत्तरप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अन्य मंत्री, तसेच संत उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमाला सनातन धर्माकडे आकृष्ट झालेले १५ देशांतील अनेक जण येणार आहेत. या महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून 'न भूतो न भविष्यती' अशा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सनातन संस्थेचे कडून करण्यात आले आहे.

वैश्विक इतिहासात अनेक संस्कृती उदयास येऊन लोप पावल्या, उदा. इजिप्शियन, ग्रीक, रोमन संस्कृती आदी; पण राजकीय संघर्ष, परकीय आक्रमणे, नैसर्गिक आपत्ती आदी संकटांना तोंड देत एकच संस्कृती टिकून राहिली, ती म्हणजे 'सनातन संस्कृती' ! सनातन म्हणजे शाश्वत, चिरंतन टिकणारे, तरीही नित्यनूतन असणारे तत्त्व ! सनातन धर्माने नेहमीच विश्वकल्याणाची संकल्पना मांडली आहे. सनातन धर्म हाच भारताचा प्राण आहे. जोपर्यंत सनातन धर्माचे अनुकरण होत होते, तोपर्यंत भारत वैभवाच्या शिखरावर होता; पण गेल्या काही दशकांमध्ये सनातन धर्माकडे हेतुपुरस्सर हेटाळणीच्या रूपात पाहिले गेले. परिणामस्वरूप अनेक कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, धार्मिक, तसेच राष्ट्रीय संकटे निर्माण झाली. आज आंतरराष्ट्रीय अनुदानावर पोसल्या जात असलेल्या अनेक व्यक्ती, तसेच संघटना सनातन धर्म संपवण्याचा विडा उचलून कार्यरत झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सनातन धर्माच्या रक्षणासाठी देव, देश आणि धर्म यांची सेवा करणार्या व्यक्ती, संस्था, तसेच संघटना यांचे संघटन अन् जागृती होणे आवश्यक आहे. सनातन धर्माच्या बळकटीकरणातूनच रामराज्याची , तेजस्वी राष्ट्राची निर्मिती शक्य आहे. त्यासाठीच गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सनातन संस्थेच्या माध्यमातून २५ वर्षे राष्ट्र आणि धर्म कार्य चालू आहे. याचाच एक भाग म्हणून सनातन राष्ट्रासाठी १ कोटी जपयज्ञ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. संतांच्या तेजस्वी वाणीतून सनातन राष्ट्राचा उद्घोष करणारे संत संमेलनही आयोजित करण्यात आले आहे. धर्मामुळे राष्ट्राचा विजय होतो. त्यामुळे मी धर्माचे म्हणजेच भगवंताचे देणे आहे, असे समजून अखंडित कार्य करायला हवे.

आताचा हा योग महाभारताच्या काळाप्रमाणे आहे असेही म्हटले आहे.. धर्माला ग्लानी आलेली असतांना ईश्वराच्या संकल्पाने हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा शंखनाद गोवा येथे होणार आहे.

सनातन संस्था सर्व संघटनांना एकत्र करून मोठे कार्य करत आहे. हिंदु देवतांनी हातात शस्त्रे धारण केली आहेत. राष्ट्राच्या सीमा या शस्त्रांनीच आखायच्या असतात, हे ध्यानात घेऊन या महोत्सवात शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे.




सर्व धर्माभिमानी हिंदूंसाठी ही पर्वणी आहे.

**१० ते १५ संतांच्या चरण पादुकांचे दर्शन**

या कार्यक्रमाच्या माध्यमातून होणार आहे. प. पू.श्रीधर स्वामी, कानिफनाथ महाराज, साईबाबा, प. पू. गगनगिरी महाराज, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, प.पू. भक्तराज महाराज अशा १० हून अधिक संतांच्या पादुकांच्या दर्शनाचा लाभ आपल्याला होणार आहे.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्याविषयी बोलणे, हे माझे सद्भाग्य समजतो. जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी आली, तेव्हा तेव्हा भगवंताने अवतार धारण केला आहे. ज्याप्रमाणे महर्षि व्यास यांनी वेद, उपनिषदे या साहित्याचे संपादन केले, तेच कार्य सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले २१ व्या शतकात करत आहेत. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी जनसामान्यापर्यंत पोचवण्यासाठी साधक निर्माण केले. त्यामुळे हे कार्य घराघरांत पोचले.

आज 'सनातन' हा विषय मोठ्या प्रमाणात चर्चिला जात असून हिंदु राष्ट्राच्या मागणीनेही जोर धरला आहे. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी तब्बल २७ वर्षांपूर्वी, म्हणजे ज्या काळी 'सनातन' हा शब्द सोडा; पण 'हिंदु' हा शब्द उच्चारणेही धाडसाचे ठरवले जायचे, अशा काळी 'ईश्वरी राज्याची स्थापना' हा ग्रंथ लिहून अध्यात्मावर आधारित राष्ट्ररचना ही संकल्पना मांडली. संतांचा द्रष्टेपणा यातून दिसून येतो. आतापर्यंत सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी धर्म, अध्यात्म आदींविषयी ३८० हून अधिक ग्रंथ संकलित केले असून भारतीय कला-विद्या यांच्या पुनरुज्जीवनासाठी अनेक उपक्रम चालू केले आहेत. हिंदुत्वावरील आघात सर्वदूर पोचवण्यासाठी त्यांनी 'सनातन प्रभात' हे हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक चालू केले. त्यांच्या प्रेरणेने हिंदूऐक्यासाठी अनेक चळवळी राबवल्या जात आहेत. या कार्याचा अल्पावधीत झालेला विस्तार ही त्यांच्या दैवी कार्याचीच साक्ष आहे.


दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

सनातन संस्थेचा रौप्यमहोत्सव आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा जन्मोत्सव यांनिमित्त आयोजित केलेला 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा केवळ धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम नसून तो धर्म आणि राष्ट्र रक्षणाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्याचा हा शंखनाद आहे. या निमित्ताने सनातन धर्माच्या सेवेसाठी कृतीशील आणि गतीशील होणे, हे एकप्रकारे राष्ट्ररचनेच्या अर्थात् धर्मसंस्थापनेच्या कार्यात सहभागी होणेच आहे. हीच सध्याच्या काळातील साधनाही आहे.

सनातन संस्थेचे मोठे कार्य असून ते वाहात्या नदीप्रमाणे आहे. ज्यामुळे प्रदेश 'सुजलाम्', 'सुफलाम्' होतो. यामुळे मन, बुद्धी आणि चित्त यांची मशागत होते.''

सनातन संस्था गेल्या २५ वर्षांपासून हिंदु धर्मरक्षणाचे कार्य करत आहे. सनातन संस्था हिंदूंना धर्म आणि मूल्य यांच्या संदर्भातील ज्ञान देत आहे. सनातन संस्था हिंदु धर्माचा आधारस्तंभ आहे. संस्थेने २५ वर्षे पूर्ण केली आहेत. गुरुमहाराज आठवलेजी (सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले) त्यांचा ८३ वा जन्मदिवस आहे.त्यांचे चरणी कोटी प्रणाम. यानिमित्ताने मी सनातन संस्थेचे अभिनंदन करतो. सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री अभय वर्तक व श्री चेतन राजहंस यांनी वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार संकलन करून आपणा सर्वांपर्यंत हे सर्व पोहोचावे याच उद्देशाने हे लिखाण करून आपणापर्यंत पोहोचवीत आहेत.

# वेळेची कदर केली तरच काळ तुमची कदर करेल

**ज्योतिर्मय साहित्य**



लग्न वेळेवर लावा : आजच्या या कलियुगात ओव्हर स्मार्ट पिढी वेळेकडे दुर्लक्ष करत चालली आज आपल्याला दिसत आहे. ते वेळेचा सदुपयोग न करता दुरुपयोग करत आहे. वेळेला आपली मालकी हक्क, संपत्ती समजत आहे. गुलाम समजत आहे. वेळेचा दुरुपयोग झाला तर काळ कसा घेरून येतो याचा विचार आजची ओव्हर स्मार्ट पिढी करत नाही. समजून घ्यायला तयार नाही. आपलच साधं सरळ उदाहरण आहे . जर आपल्याच शरीरानं वेळच्या वेळी काम करणं बंद केलं तर काय होईल. शरीराने ही वेळेचा दुरुपयोग करून त्याच्या मनमर्जीने काम करायला लागला तर तुमचं आमचं काय होईल जरा विचार करून बघायला पाहिजे.

काय.. काय.. समस्या होईल. याचा आपण अंदाज ही लावू शकत नाही. हागणं मुतन वेळेवर नाही झालं तर ?

हृदयाची ठोके वेळेवर नाही पडली तर ?

नाकाने, तोंडाने त्याच्या मर्जीने श्वास नाही घेतला तर ?

हातापायाची बोटे, हाडे, वेळेच्या वेळी, जिथल्या तिथं

वाकली नाही तर ? डोळ्यांनी वेळच्या वेळी उघडझाप नाही केली तर ? ऐन वेळेवर काही क्षणांसाठी दृष्टी जाऊन, आंधळा होऊन, काही दिसेनासे झाले तर ? वेळेवर जेवता, अन् अन्नपचन नाही झाल तर ? शरीराने वेळच्यावेळी आपली काळजी घेतली नाही तर ? असे असंख्य प्रश्न आपल्यासमोर

दिसत आहे . तरी आपण त्याकडे दुर्लक्ष करून स्वार्थी जीवन जगत आहे. माणूसच माणसाला फसवत आहे. म्हणजे तो स्वतःला फसवत आहे . जे की आपल्या स्वतःच्या

शरीरा विषयीच आहे. आपल्या शरीराला लागू पडणारे नियम आपल्या जीवनालाही लागू पडतात. आपले शरीर जर वेळेची किंमत करत असेल तर आपण माणूस असून का करत नाही? का नाही आपण इतरांचा विचार करत?

का आपण वेळ, विकत घेतल्यासारखं वागतो.. बोलतो...

का आपण आपल्या सुखासाठी इतरांचा काळ जवळ आणतो.

जो वेळेची कदर करतो काळ त्याची कदर करतो हे विधान मात्र माझ्या अनुभवातून सत्य जीवनाला लागू पडत.

आज या घडीला लोकांनी लग्नकार्यासाठी वेळ जणू या आधुनिक काळाकडून विकत घेतला की काय ?

जो पहा तो.. जो तो.. स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांच्या जीवाशी खेळतो आहे. कार्यवाहकाला; हे नाही वाटत की माझा कार्यक्रम अगदी कुठल्याही विघ्ना शिवाय पार पाडावा असं कुणाला मनातून वाटत नसावे , अशी माझी खात्री आहे. नाहीतर वेळेची बंधने पाळल्या गेली असती. वेळेची अवहेलना केले नसती. आजची स्मार्ट पिढी, जुन्या पिढ्यांना आजच्या या आधुनिक दुनियेत अत्याधुनिक करून टाकले आहे. आजचा दिवस आपला आहे उद्याचा कोणाला माहित या संकल्पनेत जगत असलेली स्मार्ट पिढी आता स्वतःहून स्वतःवर संकट ओढून आणण्याचे काम करत आहे.

त्याच्या डोक्यात त्याने एकच धरून ठेवले आहे . आजची ही वेळ आपली आहे. जणू त्याने ती विकत घेतली आहे. त्याच्या मालकीची आहे. असे आजची स्मार्ट पिढी समजते. स्वतःच्या सुखासाठी स्मार्ट पिढी इतरांचा वेळ, काळ दोन्हीही संपुष्टाकडे नेतांना दिसत आहे. लांब - लांबून येणाऱ्या पाहुण्यारावळ्यांची गैरसोय होईल याचा कोणी विचारच करायला तयार नाही. जे आहे ते नियतीच्या हातात आहे. ते म्हणून आपलं पाप दुसऱ्याच्या माधी मारून आपली सुटका झाली असे समजून पुन्हा पाप करणे याला बुद्धीचा खेळ नाही तर ना समज बुद्धीचा खेळ समजला जातो. पण हे सत्य आजच्या स्मार्ट पिढीला पचत नाही. येणारे पाहुणे लोक त्यांच्या मर्जीने येतात. पण जाताना वेळ काळाच्या मर्जीने जावे लागते. वेळ काळाच्या मध्ये घडणाऱ्या घटनेमध्ये आपण बळीचा बकरा होतो. कारण आपण चुकीच्या वेळी, वेळ आणि काळ यांच्या कार्याच्या मधी येतो. आणि या मर्जीत कोणाची वेळ काळ कसा येईल सांगता येत नाही. कोणाचा काळ येतो वेळेत नाही. कोणाची वेळ येत. कोणाचा काळ येत नाही. काहींचं तर काळ वेळ दोन्हीही येतो.

वेळ चुकल्यामुळे आपण कालचक्राच्या चक्रव्यूहात स्वतःला संपावून घेतो. हे कशामुळे ? तर हे वेळेची कदर न केल्यामुळे ;

मन मर्जीचे मालक समजल्यामुळे , स्वार्थाचा विचार केल्यामुळे . वेळेची कदर न करणाऱ्या लोकांवर काही विघ्न येत नाही हा त्यांचा गैरसमज आहे. त्यांच्यावर विघ्न हे विधीलिखित असते. आणि ते एकशे एक टक्का येणार म्हणजे येणार असते. पण काही गोष्टी ; डोळ्याच्या गोष्टी कानाला

अन् कानाच्या गोष्टी डोळ्याला कळत नाही. असं स्मार्ट पिढीला वाटतं पण ते कळण्यासाठी वेळेची समय सूचकता लागते. इतरांचा विचार करण्याची बुद्धी लागते. इतरांची कदर दिसायला वेळेची महत्त्वाची दृष्टी लागते.

आपल्या दारी आलेला पाहुणा त्याच्या घरी कसा सुरक्षित आनंदाने वापस गेला म्हणजे आपले कार्य, विना विघ्न पार पाडले असे थोडक्यात स्वतःने स्वतः शी समजावून घ्यावे.

वेळेला जणू आपल्या बाप दाद्याची जागिरी समजणारे

स्मार्ट पिढी, हायब्रिड पिढी , स्वतःला हुशार समजणारी, देखावा करणारी , स्वार्थी पिढीला दुसऱ्याच्या असल्या नसल्याचा काही फरक पडत नाही. त्यामुळे या कालचक्राने, वेळ आणि काळाने आपली ही मनमानी करायला सुरुवात केली . उन्हाळ्यात पाऊस पडतो. हिवाळ्यात ऊन लागते.

पावसाळ्यात तापायला लागते. आजच्या या लोकांच्या स्वार्थी वृत्तीमुळे काळ आणि वेळाने आपले रूप वेगवेगळ्या स्वरूपात दाखवायला सुरुवात केले. पहिले एका वर्षात तीन ऋतू यायचे आता तसं नाही आता एका ऋतूत तीन ऋतू यायला लागले आहे. कालचक्र या स्मार्ट पिढीमुळे या हुशार लोकांमुळे वेळेचा दुरुपयोग करणाऱ्या लोकांमुळे, वेळ फालतू वाया घालणाऱ्या लोकांमुळे या कलियुगामुळे

कालचक्रही आता स्वार्थी होऊ, पाहू लागला आहे.

वेळेचा दुरुपयोग केल्यामुळे माणसाच आयुष्यही कमी झाला आहे. जन्माला आलेला म्हातारा होऊन मरेल अशी शास्वती आजचा काळ देत नाही. कारण आजची स्वार्थी स्मार्ट पिढी

जी वेळेला गुलाम करू पाहते. विकत घेऊ पाहते.

आजच्या या मनमानी युगात बरेच लग्न समारंभ आता

पाच आणि सहा वाजेला लागत आहे.

संध्याकाळचं सात वाजेच लग्न रात्री अकरा - बारा वाजेला लागत आहे. येणाऱ्या जाणाऱ्यांची हाल बेहाल होत आहे

अशा या रात्री मध्यरात्री प्रवास करने धोक्याचेच आहे. प्रवासात कोणी मोटरसायकवर , कुणी बस ने , कोणी रिक्षाने , कोणी गाडीने जमेल त्या सुख सुविधेने नात्यागोत्यांना उजाळा द्यायला येत असते . मुहूर्ताचा मेळ नाही. त्या मुहूर्ताला किंमत नाही. कार्यक्रमाला आलेल्या लोकांची कदर नाही.

अशा या परिस्थितीत तुम्ही आपण सगळे वेळेची छेडछाड करत आहोत , वेळेचा अपमानित करत आहो , वेळेला नीच दाखवत आहो, वेळेला विकत घेण्याचा विचार करत आहोत

अशा विचारात आपल्या भ्रष्ट झालेल्या बुद्ध्या स्वतःच्या स्वार्थासाठी वापरून स्वतःला स्मार्ट समजून घेत आहे.

तुमच्या स्वार्थापोटी इतरांची गैरसोय होऊन, प्रवासात अचानक मध्यरात्री गाडी पंचर होणे, इंधन संपणे, जीवावर बेतने, जीवाचे हाल होणे, संकट ओढून येणे, आणि घातपात होणे शुभ कार्यात अशुभ कार्य घडून येणे, म्हणजे वेळेला महत्व न देणे होय. वेळेची कदर कराल तरच काळ तुमची कदर करेल; नाहीतर माती करेल.

***


लक्ष्मण वाल्डे-कन्नड
छत्रपती संभाजीनगर
मो.नं-८८८८६०६८६८




# कर्नाटकमधील जागतिक भक्ती संमेलनात डॉ दत्तात्रय डुंबरे वारकरी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

**बेळगाव –** छत्रपती संभाजीनगर येथील विवेकानंद महाविद्यालयातील मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा.डॉ.दत्तात्रय प्रभाकर डुंबरे यांना संत साहित्यातील समीक्षणात्मक लेखनाबद्दल इटली येथील रासरसिक प्रभू व वृंदावन येथील पांडुरंग प्रभू यांच्या हस्ते वारकरी समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंढरपूर येथील इस्कॉनचे अध्यक्ष रुपमोहन प्रभू हे होते. व्यासपीठावर पुणे येथील जिल्हा न्यायाधीश बी.डी. कुलकर्णी, कीर्तनकार संजय पाटील, ह.भ.प.बाळकृष्ण म. गिरी, स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

बेळगाव जिल्ह्यातील करीकोट्टी येथे दि.१२/०५/२०२५ रोजी दुसर्या जागतिक भक्तीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.भारतातील विविध राज्यातील प्रतिनिधींसोबत इटली, अमेरिका, पोर्तुगाल आदी राष्ट्रांतील अभ्यासक व उपासकांची उपस्थिती होती. दीप प्रज्वलनाने संमेलनाचे उद्घाटन बी.डी. कुलकर्णी यांचे शुभहस्ते झाले.यावेळी डॉ.डुंबरे यांच्या सार्वकालिक ज्ञानदेव तुकाराम ग्रंथाचे लोकार्पण करण्यात आले.

डॉ.डुंबरे यांनी आत्तापर्यंत संत साहित्य समीक्षेसंबंधी जी मांडणी केली आहे ती संत साहित्य संशोधनाला नवी दिशा देणारी आहे. संत गोरा कुंभार, वारकरी परंपरा, सार्वकालिक ज्ञानदेव तुकाराम या त्यांच्या ग्रंथांमूळे एक सूत्रबध्द मांडणी समोर आली आहे.'' असे गौरवोद्गार पंढरपुर येथील रुपमोहन प्रभू यांनी काढले.

सत्काराला उत्तर देताना डॉ.डुंबरे यांनी शाम गिरी महाराज यांच्या कर्नाटकातील वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसारासाठी केलेल्या कार्याचा परिचय करुन दिला. दिंड्यांची परंपरा तसेच तुकोबांच्या गुरुपरंपरेतील राघव चैतन्य व केशव चैतन्य यांच्या कर्नाटकातील कार्याची ओळख करुन दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीकट्टी येथील प्रा.पाटील यांनी केले.प्रास्तविक बाळकृष्ण गिरी यांनी केले.जीवन पाटील यांनी आभार भानले.

# पहिल्या ग्रामीण काव्यसंमेलनाध्यक्षपदी साहित्यिक रज्जाक शेख

**ज्योतिर्मय साहित्य**



**श्रीरामपूर –** महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालयात पहिले ग्रामीण साहित्य संमेलनाअंतर्गत शिवसंभूकाव्यसंमेलन आयोजन केले आहे.महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक गजलकार रज्जाकभाई शेख यांची काव्यसंमेलन अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड केल्याचे पत्र कै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नवनाथ युवा मंडळ, आणि धर्मवीर सार्वजनिक वाचनालय निमगाव वाघा जिल्हा अहिल्यानगर यांच्यावतीने अध्यक्ष पैलवान नानाभाऊ डोंगरे यांनी दिले.बुधवार दिनांक १४ मे २०२५ रोजी होणाऱ्या या कविसंमेलनात राज्यभरातील नामांकित कविकवयित्री यांची हजेरी लागणार आहे. तसेच शिवसंभूचरित्र गाणारी शाहीर मंडळी शिवशाहीरी जलसा सादर करणार आहे.यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.ग्रामीण साहित्यिक रज्जाकभाई शेख यांनी विविध राज्यस्तरीय संमेलनात आपल्या कवितेचे उत्तम सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या अठराशे पेक्षा जास्त कविता विविध वृत्तपत्र, मासिके व दिवाळी विशेषांक यांत प्रकाशित झालेल्या आहेत. कविता, कथा लेख, यांचे लेखन तसेच हास्यकविता, लेख, हायकू, अभंग, प्रेमकविता, गझल, काव्यंजली अष्टक्षरी, आदी काव्यप्रकारात लेखन केले आहे. आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन गुजरात, अखिल भारतीय साहित्य संमेलन उस्मानाबाद, नाशिक, वर्धा, आखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलन पुणे, येथे त्यांच्या कवितांची निवड झाली आहे. शिरूर येथील राज्यस्तरीय कविसंमेलन,कन्नडचे तिफण संमेलन, श्रीरामपूर येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संमेलन, नेवासा येथील शिवस्वराज्य काव्यसंमेलन, पिंपरी कोलांदर, तसेच औरंगाबाद येथील बोधी ट्री एज्युकेशन संस्थेच्या कविसंमेलनाचे ते माजी कवीसंमेलनाध्यक्ष आहेत. निवडपत्र देताना संस्थेचे अध्यक्ष पैलवान नानाभाऊ डोंगरे, ग्रामीण कवी आनंदा साळवे, आदर्श शिक्षक देविदास बुधवंत, आत्माराम शेवाळे, बाळासाहेब कोठुळे, गोरखनाथ पवार, चंद्रकांत परदेशी, प्रसाद काळे, बाळासाहेब कोठूळें, बेनझीर शेख, गीताराम नरवडे, आत्माराम शेवाळे, नितीन गायके, बाळासाहेब मुंतोडे, आदी मान्यवर कवी उपस्थित होते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559